# Media Publications of Shankarlal Agrawal Science College, Salekasa

## 2013-14

लोकमत

सोमवार, दि.२ सप्टेंबर २०१३

# सार्वजनिक स्वच्छता विषयावर निबंध स्पर्धा

सालेकसा : प्रताप मेमोरीयल चॅरीटेबल ट्रस्ट गोंदियाद्वारे संचालित शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथे सार्वजनिक स्वच्छता नागरिकांचा हक्क व कर्तव्य, या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. या निबंध स्पर्धेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्साहाने आपला सहभाग नोंदविला.

निबंधाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सार्वजनिक स्वच्छतेविषयी नागरिकांचे अधिकार आणि कर्तव्य याविषयी आपले परखड मत मांडले. आपल्या निबंधात विद्यार्थ्यांनी पाणवठ्याचे व्यवस्थापन घाणकचऱ्यांचे व्यवस्थापन, कचऱ्यांपासून उर्जानिमित्ती, गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियान व त्या अंतर्गत राबवले जाणारे उपक्रम या सर्व विषयांना स्पर्श करीत स्वच्छतेची ज्योत पेटविण्याचे आवाहन केले.

या स्पर्धेत ज्ञानेश्वरी कटरे या विद्यार्थीनीने प्रथम तर अंकीता फुंडे हिने द्वितीय क्रमांक पटकावला. सर्व सहभागी व यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.व्ही. खुदळे यांच्या हस्ते करण्यात आला.

स्पर्धेचे आयोजन व परीक्षण प्रा. डॉ. मच्छिंद्र नंदेश्वर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. भूपेश मेंढे, प्रा. अपर्णा खुरसेल, प्रा. राहुल कवाडे, प्रा. मंगेश खोब्रागडे, प्रा. आरती अंबुले, मुकेश कटरे, सुनील बिसेन, बी.आर. लांडगे, वाय.टी. रहांगडाले, सतिश अग्रवाल, सुमेध भौतमांगे, पंकज आत्राम, दीपक नागवंशी, मुकेश बावनकर, दीपक मेश्राम यांनी सहकार्य केले (प्रतिनिधी)

लोकमत

मंगळवार, दि. ५ नोव्हेंबर २०१३

# तालुकास्तरीय वक्तृत्व करंडक स्पर्धेत आचल प्रथम



सालेकसा : पंचायत समिती तथा जिल्हा पाणी व स्वच्छता मित्र कक्ष जिल्हा परिषद गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वच्छतामित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेत प्रताप मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट गोंदियाद्वारा संचालित शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थिनी आंचल गुप्ता हिने प्रथम क्रमांक पटकावून विज्ञान महाविद्यालयाचा गौरव वाढविला.

सालेकसा तालुकास्तरावर झालेल्या या स्पर्धेत महाविद्यालयाची बी.एस.सी. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी आंचल हिने वरिष्ठ महाविद्यालयीन गटात 'लोकसहभाग गावाचा-आधार पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा' या विषयावर आपले विचार व्यक्त करुन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत प्रतीक अवस्थी या विद्यार्थ्याने कनिष्ठ महाविद्यालयीन गटात 'जोश तरुणाईचा, जागर स्वच्छतेचा' या विषयावार आपले विचार मांडले व कनिष्ठ महाविद्यालयीन गटात तालुक्यात तिसरा क्रमांक प्राप्त केला.

स्मिता सावनकर या विद्यार्थिनीने वरिष्ठ महाविद्यालयीन गटात तर प्रदीप मछिये याने कनिष्ठ महाविद्यालयीन गटात आपला सहभाग नोंदविला.

स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य डॉ. एस.व्ही. खुदळे व इतर प्राध्यापक वर्गांना दिले. प्रा. डॉ. एम.पी. नंदेश्वर व प्रा. मंगेश खोब्रागडे यांनी परिक्षक म्हणून आपली भूमिका पार पाडली. त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. (प्रतिनिधी)

लोकमत रविवार, दि.२७ ऑक्टोबर २०१३

# विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रसंतांना अभिवादन

## एस.व्ही. खुदळे यांचे मार्गदर्शन : तुकडोजींनी वाढविले युद्धप्रसंगी जवानांचे मनोबल

सालेकसा : प्रताप मेमोरीयल चॅरीटेबल ट्रस्ट गोंदिया व्दारे संचालित शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय, सालेकसा येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.व्ही. खुदळे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. भुपेश के. मेंढे, प्रा. राहुल पी. कवाडे, प्रा. डॉ. मच्छिंद्र पी. नंदेश्वर, प्रा. डॉ. अपर्णा खुरसेल, प्रा. मंगेश खोब्रागडे उपस्थित ...ते. आपल्या समयोचित भाषणांतून ...र्व प्रमुख अतिथींनी राष्ट्रसंत ...डोजी महाराज यांच्या जीवनाचे ...ध पैलू उलगडून सांगितले.

...चंद्रकुमार पटले या बी.एस.सी. ...सत्राच्या विद्यार्थ्याने आपल्या ...र्त भाषणात दरबडा या गावी ... तुकडोजी महाराजांनी भेट ...नी, असे संस्मरण सांगितले. ...अध्यक्षीय भाषणात प्रा. ... खुदळे यांनी विविध ... राष्ट्रसंतांनी आपल्या ...गीव्दारे भारतीय जवानांचे वाढविले. राष्ट्रीय प्रबोधनासाठी केलेल्या कार्यामुळे त्यांना राष्ट्रसंत ही पदवी बहाल करण्यात आल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी त्यांचा संदेश आत्मसात करावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे संचालन स्मिता सावनकरने केले. कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तपणे प्रा.डॉ. मच्छिंद्र नंदेश्वर यांच्या ... मुकेश कटरे, सुनील बिसेन, बी.आर. लांडगे, वाय.टी. रहांगडाले, सतीश अग्रवाल, सुमेध भौतमांगे, पंकज आत्राम, दीपकसिंह नागवंशी, मुकेश बावनकर, दीपक मेश्राम यांनी सहकार्य केले.



शंकरलाल अग्रवाल विज्ञान विद्यालयात तुकडोजी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकताना अतिथी.

**इटखेडा :** वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यतिथी गुरुदेव सेवा मंडळ, ग्रामवासीय बंधुभगिनींनी ... मंदिरात या निमित्ताने घटस्थापना करण्यात आली. ग्रामस्वच्छता अभियानाने या कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. ग्रामवासीयांनी सडा-सारवण करून दारासमोर रांगोळ्या रेखाटल्या होत्या. भजन पूजनादी कार्यक्रमाने पार पडलेल्या या पुण्यतिथीच्या निमित्ताने वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर ग्रामवासीय व ... एकत्र येत महाराजांना मौन श्रध्दांजली अर्पण केली. ह.भ.प. शहारे महाराज यांनी आपल्या जाहीर कीर्तनातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीता व भजनाचा अर्थ उलगडून दाखवीत राष्ट्रप्रेम, सामाजिक ऐक्य, स्थापन करीत जातीभेद व अंधश्रध्दा नष्ट करण्याचे आवाहन केले. प्रात:समयी भाविकांनी रामधून गायिली. वंदनीय महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. गोपालकाला व सामूहिक भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमात देवीदास पालिवाल, गोविंदा ढोरे, श्रावण सौंदरकर, दिगांबर झिलपे, गोविंदा सौंदरकर, पदम जिरीत्कार, शंकर कुंभलवार, कृष्णा ढोरे, छबील बुराडे, सुभाष देशमुख, इंद्रदास झिलपे, मिलिंद ढोरे, रमेश कुंभरे, रामेश्वर राजगडे, गोपीचंद कावळे, नामदेव कामडी, सुधाकर ढोरे, लुमा जिरित्कार, नितीन घोरे, कुंता कोकोडे, विमल भावे, उत्तरा जिरीत्कार, येणूबाई कांबडी यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. प्रतिमेला अभिवादन करून

लोकमत
र, शनिवार, दि. २८ डिसेंबर २०१३

# स्त्री-पुरुष समानतेवर व्याख्यान

सालेकसा : प्रताप मेमोरीयल चेरिटेबल ट्रस्टव्दारे संचालित शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथे जागर जाणीवांचा या अभियानांतर्गत स्त्रीपुरुष समानता या विषयावर व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.व्ही. खुदळे, प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ.अपर्णा सुरसेल, प्रा.डॉ. भूपेश मेंढे, प्रा. राहूल कवाडे उपस्थित होते. स्त्री-पुरुष समान आहेत ही जाणीव आज प्रत्येकाला आहे. मात्र या विषयी समाज मनात जागृती घडविणे गरजेचे असल्यामुळे आज या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे कार्यक्रमाचे आयोजक डॉ. मच्छिंद्र नंदेश्वर यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. आपल्या संबोधनात डॉ. अपर्णा सुरसेल यांनी स्त्रीवर होणाऱ्या अत्याचारासाठी जेवढे पुरुष जबाबदार आहेत किंबहुना त्यापेक्षा स्त्रीमुळेच स्त्रीला अत्याचारांना सामोरे जावे लागते असे म्हणाले.

जोपर्यंत बाल संगोपनात व घरगुती कामात पुरुष आपला समान वाटा उचलत नाही. तोपर्यंत स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करणे शक्य हौणार नाही, असे प्रतिपादन प्रा.डॉ. भूपेश मेंढे यांनी केले.

पुरुष प्रधान संस्कृतीने धर्म व संस्कृतीला नावावर जखडून ठेवले. दैवतीकरण करुन तिचे माणूसपण हिरावून घेतले. त्यामुळे स्त्रीने स्वत:ला या जोखडातून मुक्त करुन स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी पाया घालावा, असे आवाहन प्रा. राहूल कवाडे यांनी केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.एम.व्ही.खुदळे यांनी राज्यघटनेने जरी स्त्री पुरुषामध्ये समानता मानली असली तरी जोवर समाजमन जागृत होणार नाही. तोवर खऱ्या अर्थाने स्त्री पुरुष समानता प्रस्थापित होणे शक्य नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्त्री पुरुष समानतेचा विचार आपल्या मनात रुजवावा असे आवाहन केले. याप्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थी निमेश्वरी टेंभरे, भिमेश पटले, ज्ञानेश्वरी कटरे, खिलेश कटरे, आचल गुफा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यापीठ गीत गायनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा.डॉ. मच्छिंद्र नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तपणे केले. या उपक्रमासाठी प्रा. मंगेश खोब्रागडे, प्रा.ज्योती गजभिये, प्रा. मंजूषा फुंडे, प्रा. उमेश वलथरे, मुकेश कटरे, सुनिल बिसेन, आशीष पांडे, बी.आर.लांडे, वाय.टी.रहांगडाले, सतीश अग्रवाल, सुमेध भौतमांगे, पंकज आत्राम, दिपकसिंह नागवंशी, मुकेश बावनकर, दीपक आत्राम यांनी सहकार्य केले. (प्रतिनिधी)

लोकमत शुक्रवार, दि. ३१ जानेवारी २०१४ ३



स्पर्धेतील यशाबद्दल शाहरुखचा सत्कार करताना

# तायक्वांडोतील यशासाठी शाहरुखचा सत्कार

सालेकसा : शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथील बी.एस.सी. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी शाहरुख इस्माइलखान पठान याने तायक्वांडो स्पर्धेत नागपूर विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावला व त्यानंतर त्याने चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय स्पर्धेत नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयाने त्याचा सत्कार केला.

महाविद्यालयात आयोजित सत्कार कार्यक्रमात प्राचार्य संजय खुदळे यांनी पुष्प व स्मृतिचिन्ह देवून कौतुकास्पद कार्य केल्याबद्दल गौरव केला. या सत्कार कार्यक्रमात प्रामुख्याने प्रा.डॉ. अपर्णा खुरसेल, प्रा. डॉ. भूपेश मेंढे, प्रा. डॉ. मच्छिंद्र नंदेश्वर, प्रा.डॉ. राहुल कवाडे, प्रा. मंगेश खोब्रागडे, प्रा. विवेक बहेकार व इतर मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ द्वारे आयोजित आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत शाहरुख ने नागपूर येथे ५८ ते ६३ किलो. वजनी गटात तायक्वांडो स्पर्धेत विद्यापीठ स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. त्याचा नागपूरे विद्यापीठातर्फे सत्कार करण्यात आला. त्यानंतर नागपूर विद्यापीठाने त्याला चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांडो स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले.

शाहरुखने आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य खुदळे यांच्या सह इतर प्राध्यापक वर्ग व आपल्या प्रशिक्षकांना दिले. सत्कार कार्यक्रमाला प्रा.मेश्राम, प्रा.सतीश भोंडे, प्रा. ज्योती गजभिये, प्रा. मुजुषा फुंडे, प्रा. उमेश वलथरे, मुकेश कटरे, सुनिल बिसेन, वाय.टी. रहांगडाले, सतिश अग्रवाल, सुमेध भौतमांगे, पंकज आत्राम, दीपक नागवंशी यांचे सहकार्य लाभले. (प्रतिनिधी)

लोकमत मंगळवार, दि.४ फेब्रुवारी २०१४

# हुतात्मा दिन साजरा

सालेकसा : प्रताप मेमोरीयल ट्रस्ट गोंदियाद्वारे संचालित शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी हुतात्मा दिन म्हणून साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.व्ही. खुदळे, प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. भूपेश मेंढे, प्रा. राहूल कवाडे, प्रा. डॉ. मच्छिंद्र नंदेश्वर, डॉ. अर्पणा खुरसेल, प्रा. मंगेश खोब्रागडे, प्रा. नितेश मेश्राम, प्रा. ज्योती गजभिये, प्रा. मंजुषा फुंडे, प्रा. उमेश वलथरे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या छायाचित्राला दीप प्रज्वलन करून माल्यार्पण करण्यात आले. यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदरांजली वाहण्यात आली. प्राचार्य डॉ. खुदळे मार्गदर्शन करताना म्हणाले की, भारतातील भगवान महावीर व गौतम बुद्धाचा सत्य अंहिसेचा संदेश अंमलात आणून महात्मा गांधींनी बालढ्य इंग्रजी सत्तेला उखडून स्वातंत्र्य मिळवून दिले. सत्य व अहिंसा ही दुर्बळांची भूषणे नसून वीरांची आभूषणे आहेत. म्हणून आजच्या युवा पिढीने व विद्यार्थ्यांनी या तत्वांचा अंगीकार करुन देशसेवेसाठी तत्पर राहावे, असे आवाहन केले. उपस्थित सर्व अतिथींनी आपल्या समयोचित भाषणातून हुतात्मा दिनाचे महत्व विषद केले. ३० जानेवारीला १९४८ रोजी प्रार्थनेसाठी जात असताना नाथुराम गोळसे यांनी महात्मा गांधी यांना गोळ्या झाडून खून केला होता. तेव्हा संपूर्ण जग सुन्न झाला होता. महात्मा गांधी यांची पुण्यतिथी देशात शहीद दिन म्हणून साजरी करण्यात येते. कार्यक्रमाचे संचालन अशोक लिल्हारे यांनी तर आभार मुकेश कटरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मच्छिंद्र नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनात सुनील बिसेन, बी.आर. लांडगे, वाय.टी. रहांगडाले, सतिश अग्रवाल, सुमेध भौतमांगे, पंकज आत्राम, दीपक नागवंशी, मुकेश बावनकर, दीपक मेश्राम यांनी सहकार्य केले. (प्रतिनिधी)